## ' प्रेसनोट'

दिनांक : ११/०५/२०२६

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| आरोपी लोकसेवकाचे नाव, पद, वर्ग व कार्यालय | श्री. राहुल शंकरराव निस्वादे, वय ४३ वर्ष ,<br>पद—महसुल सहायक, तहसिल कार्यालय, तिवसा, जि. अमरावती.<br>पद— **वर्ग ३**,<br>रा. श्री हरले यांचे घरी किरायाने विश्वशांती नगर, शेगांव रोड, अमरावती. मूळ रा. मोर्शी पाळा, ता. मोर्शी, जि. अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/— रु. |
| तडजोडी अंती मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५००/—रु |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,००/—रु |
| घटनास्थळ | तहसिल कार्यालय, तिवसा, जि. अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | दि.११/०५/२०२६ चे १२.४५ वा. ते १३.०० वा. दरम्यान |

**थोडक्यात हकीकत:—** दिनांक ०८/०५/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे विरूध्द तहसिल कार्यालय, तिवसा, जि. अमरावती येथे प्रतिबंधक कारवाईचे प्रकरण सुरू असून सदर प्रकरणात वारंवार तारीख न देता प्रकरण संपविण्या करीता यातील आरोपी लोकसेवक नामे श्री राहुल शंकरराव निस्वादे, महसुल सहायक, तहसिल कार्यालय, तिवसा, जि. अमरावती यांनी तक्रारदार यांना २,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार प्राप्त झाली. प्राप्त तक्रारीवरून दिनांक ०८.०५.२०२६ रोजी पडताळणी कारवाई क्रमांक १ करण्यात आली परंतू सदर दिवशी तक्रारदार व आलोसे यांची प्रत्यक्ष भेट झाली नाही. त्यानंतर आज दिनांक ११.०५.२०२६ रोजी पळताडणी कारवाई क्रमांक २ दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रतिबंधक कारवाई अनुषंगाने वारंवार तारीख न देता प्रकरण लवकर निपटविण्या करीता तडजोडी अंती १५०० रूपये लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने लागलीच करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचे कडून १५०० रूपये लाच रक्कम पंचांसमक्ष स्विकारली वरून आलोसे नामे श्री राहुल शंकरराव निस्वादे, महसुल सहायक, तहसिल कार्यालय, तिवसा, जि. अमरावती यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पो.स्टे. तिवसा, जि. अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती चे पोलीस अधीक्षक श्री.बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक श्री.सुनिल किनगे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि, चित्रा मेसरे, पो.हे.कॉ. सुधिर चर्जन, पो.हे.कॉ. युवराज राठोड, पो.शि. वैभव जायले, चालक पो.उप नि. सतीश किटूकले, यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :— १)श्री.बापू बांगर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती
मो.नं.९०११३२३४२६
२) श्री.सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती
मो.नं.९७६४२१०४८५
३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती
मो.नं.९८२३१११५५, ७५१७५७१०६४

**कार्यालयाचा पत्ता** :— ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, ललीत सेंटर परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्रमांक :— १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१—२५५३०५५

( चित्रा मेसरे )
पेलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती